जा.क्र.प्राधि/२००९/3380/प्र.१४
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
दिनांक : 10 SEP 2009

विषय : अमराठी भाषिक अधिकारी/कर्मचारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण झाले नसतील तर त्यांना देण्यात आलेली मुदतवाढ रद्द करण्याबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.मभाप-१०८७/१४/प्र.क्र.२/८७/२०, दि.३०.१२.१९८७.
२. शासन निर्णय क्र.मभाप-१०९२/१५७०/प्र.क्र.१४३/९२/२०, दि.१.१.९३. प्रत संलग्न
३. शासन परिपत्रक क्र.मभाप-२००१/प्र.क्र.६८/२००१/२०ब, दि.२५.९.२००१
४. प्राधिकरणाचे पत्र क्र.प्राधि/संकीर्ण/२००७/२८५३/प्र.१४, दि.२.८.२००७ व त्या सोबतचे शासन पत्र दि.२०/६/०७.

## परिपत्रक

शासनाकडील सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. (१), दिनांक ३०/१२/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी यांच्यासाठी मराठी भाषा परिक्षा नियम विहित करण्यात आले आहेत. सदरहू नियम अंमलात येण्याची तारीख किंवा संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणूकीची तारीख यापैकी जी नंतरची असेल, त्या तारखेपासून दोन वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी निम्नस्तर परिक्षा आणि निम्नस्तर परिक्षा उत्तीर्ण झाल्यापासून दोन वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी उच्चस्तर परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२/- तसेच, संदर्भ क्र.(२), दि.१.१.१९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जे अधिकारी/कर्मचारी एतदर्थ मंडळाची मराठी भाषा निम्नस्तर परिक्षा आणि उच्चस्तर परिक्षा अनुक्रमे दिनांक ३०.१२.१९८९ व दिनांक ३०.१२.१९९१ पर्यंत उत्तीर्ण झालेले नाहीत अथवा मराठी भाषा परिक्षेच्या नियमावलीनुसार सुट मिळण्यास पात्र नाहीत त्यांना अनुक्रमे

दि.३०.१२.१९८९ व दि.३०.१२.१९९१ नंतर देय असलेल्या वेतनवाढी रोखणे आवश्यक होते. तथापि, प्राधिकरणांतर्गत विभाग आणि विभागीय मंडळातील जे अधिकारी / कर्मचारी मराठीच्या विहित परिक्षा दि.३०.१२.१९८९ व दि.३०.१२.१९९१ पर्यंत उत्तीर्ण झाले नाहीत अथवा शासन निर्णयानुसार सूट मिळण्यास पात्र नाहीत अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि.३०.१२.१९८९ नंतरच्या वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत, असे निदर्शनास आलेले आहे.

३/- उपरोक्त शासन निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील सर्व मंडळाना / विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, जे अधिकारी/कर्मचारी मराठी भाषेच्या विहित परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण झाले नसतील किंवा नियमानुसार सूट मिळण्यास पात्र नसतील अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांची वर्गनिहाय यादी तयार करण्यात यावी आणि एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा परिक्षेच्या संबंधात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, अधिसूचना/परिपत्रके, सूचना इत्यादी नोटीसीद्वारे सर्व संबंधितांच्या पुन्हा एकदा निदर्शनास आणून द्याव्यात. तसेच, यापुढे दर दोन वर्षांनी आस्थापनेवरील सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास त्या सूचना आणून त्यांना मराठी भाषा उत्तीर्ण होणे ही कर्मचाऱ्यांची/ अधिकाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी असून सदरहू परीक्षा उत्तीर्ण होणे सक्तीचे असल्याबाबतची जाणीवही करुन द्यावी.

४/- जे अधिकारी/कर्मचारी मराठी भाषेच्या विहित परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण झाले नसतील किंवा नियमानुसार सूट मिळण्यास पात्र नसतील अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना दि.३०.१२.१९८९ व दि.३०.१२.१९९१ नंतरच्या वेतनवाढी दिल्या असल्यास त्या पूर्वलक्षी प्रभावाने रोखण्यात याव्यात व त्यांच्याकडून वेतनवाढीची दिलेली सर्व रक्कम वसूल करण्यात यावी. अशा प्रकारे रोखून धरलेल्या वेतनवाढी, सदर अधिकारी / कर्मचारी ज्या तारखेला परिक्षा उत्तीर्ण होईल किंवा ज्या तारखेला त्याला अशा प्रकारे उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल, असा तारखेला देय होतील आणि जणूकाही त्याच्या वेतनवाढी रोखल्या गेल्या नव्हत्या असे समजून त्या उपार्जित होतील. परंतू वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्याला हक्क असणार नाही.

५/- प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील विभागप्रमुखांनी सदर आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास ञाणून त्याची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची तसेच मंडळाची आहे.

(शिवाजी दिवेकर)
सचिव / प्राधिकरण.

प्रत सस्नेह अग्रेषित :

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मुख्य अभियंता/प्रा. [१/२]
३. वित्त नियंत्रक/प्रा
४. विधी सल्लागार/प्रा.
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.,
७. चौकशी अधिकारी/प्रा.
८. सक्षम प्राधिकारी (१) (२) /प्रा.
९. जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१०. मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./मु.इ.दु.व पु.मं./मुं.ग.व सु.म. कोंकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती मंडळ
११. सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/मु.इ.दु.व पु.मं.
१२. उपमुख्य अभियंता (स्थापत्य)/मुं.मं. (दक्षिण) (उत्तर) (पुनर्रचना) (दु.वपु.) (नियोजन)/मुं.मं. द.व गु.नि./प्रा. एस.आर.डी.मुं.मं./संक्रमण शिबिर /दुवपु.
१३. वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार /मुं.मं.
१४. कार्यकारी अभियंता (विद्युत) [ दुरुस्ती ] (वांद्रे) [घाटकोपर] /मुं.मं.,१,२,३/प्रा.
१५. कार्यकारी अभियंता / विद्युत/प्रा.
१६. कार्यकारी अभियंता (पूर्व) (पश्चिम) (शहर) ग.व.सु.मंडळ
१७. संचालक पणन कक्ष/मुंबई मंडळ.
१८ मुख्य लेखाधिकारी/मुं.गृ.व क्षे.वि.मं./मुं.इ.दु.पु.मं./मुं.ग.व.सु.मं.
१९. उपनिबंधक सहकारी संस्था/मुं.मं.
२०. मिळकत व्यवस्थापक (१) (२) (३) (४) (५)/ (विक्री)/मुं.मं. (पु.गा.)/ (सं.शि.)/ दुवपुमं.
२१. उपमुख्य अधिकारी [ मि.व्य.१/२] डब्ल्यू /मुंबई मंडळ
२२. लेखाधिकारी/प्रा. डब्ल्यु./मुं.मं.
२३. सहाय्यक लेखाधिकारी (उत्तर) (दक्षिण) (सं.गा.)/मुं.इ.दु.व पु.मंडळ
२४. मुख्य लेखा अधिकारी कोंकण/पुणे नाशिक औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
२५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी/प्रा.
२६. संचालक/पी.डी.सी. पुणे.

मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
लोकायुक्त/उप लोकायुक्त, मुंबई (पत्राने),
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे कार्यकारी अधिकारी,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-1, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-1, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-2, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-2, नागपूर,
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयातील विभागांच्या नियंत्रणाखालील इतर सर्व विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख,
निवड फाईल,
सर्वसाधारण नस्ती.

मिळण्यास पात्र नाहीत अशांनाही त्यांच्या दिनांक 30 डिसेंबर 1989 व दिनांक 30 डिसेंबर 1991 नंतरच्या वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी जे अधिकारी/कर्मचारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण झाले नाहीत अथवा विहित नियमानुसार त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचे आदेश निर्गमित केलेले नाहीत अशा अधिका-यांना व कर्मचा-यांना अनुक्रमे दिनांक 30 डिसेंबर 1989 व 30 डिसेंबर 1991 नंतरच्या वेतनवाढी दिल्या असल्यास त्यांच्याकडून वेतनवाढीची दिलेली सर्व रक्कम वसूल करण्यात यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.व. आम्बेरकर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,

**मा.सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी**
**<u>नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.</u>**

**<u>परिपत्रक</u> : प्राधिकरण / १ / २०१०, दि.२०/१/२०१०**

---

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१**
**क्र.प्राधि/नियुक्त्या/नियमितीकरण/२०१०/३८३ /प्र.१३, दिनांक : 25 JAN 2010**

---

**वाचा :** शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/ प्र.क्र.४७/ ०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट, २००५

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आणि प्राधिकरणाच्या अखत्यारीतील विभागीय मंडळांमधील गट-अ ते गट-क मधील सरळसेवेच्या कोट्यातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार स्पर्धा परीक्षांद्वारे निवड केलेल्या उमेदवारांमधून / नामनिर्देशनाद्वारे अर्हताप्राप्त उमेदवारांमधून भरण्यात येतात. तथापि, काही वेळा तातडीची गरज म्हणून तीन महिन्याच्या किंवा चार महिन्याच्या तत्वावर तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या केल्या जातात. तथापि, अशा तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या विशिष्ट मुदतीनंतर संपुष्टात आणल्या जात नाहीत. त्या दीर्घ काळ चालू राहतात. त्यामुळे असे अस्थायी कर्मचारी सेवेत कायम करण्याची मागणी करतात. त्यांची सदर मागणी मान्य न केल्यास ते न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र संबंधित नियम, आदेश यांचा योग्य आधार घेऊन प्राधिकरणाची बाजू योग्य रितीने न्यायालयात मांडली जात नाही. तसेच, अशा प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय / मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश न्यायालयांच्या निदर्शनास आणले जात नाहीत. सबब अशा प्रकरणात निर्णय प्राधिकरणाच्या विरोधात लागतात. परिणामी अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करावे लागते. अनेक प्रकरणात न्यायालयांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सेवा प्रवेश नियमातील अटी देखील शिथील कराव्या लागतात.

२. अशाच एका प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार, कॉ.ऑ.सोसायटीज, तमिळनाडू व इतर या सिव्हील अपिल क्र.१४१३/२००३ आणि इतर सिव्हील अपिले या प्रकरणी दिनांक २८/७/२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्याची सूचना केली होती. त्यास अनुसरुन सदर प्रकरणातील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयातील संक्षिप्त बाबी खालीलप्रमाणे सर्व विभागप्रमुखांच्या निर्दशनास आणून देण्यात येत आहेत :

a) Regularisation cannot be mode of recruitment by any State within the meaning of Article 12. It is a settled proposition that the appointment made in violation of the mandatory provision of the statute and in particular ignoring the minimum educational qualification and other qualifications

would be wholly illegal and such illegality cannot be cured by taking recourse of regularization.

b) Those who come by back door should go through that door.

c) Regularisation further cannot be given to the employees whose services are ad-hoc in nature.

d) No regularization is permissible in exercise of the Statutory power conferred under Article 12 of the Constitution of India when the appointments are in contravention of the statutory rules.

e) No regulation is permissible in exercise of the statutory power conferred under Article 162 of the Constitution if the appointments have been made in contravention of the statutory rules.

f) It is trite that appointments cannot be made on political considerations and in violation of the Government directions for reduction of establishment expenditure or filling up of vacant posts or creating new posts including regularization of daily wage employees.

g) There is no scope for regularization unless the appointments were made on a regular basis.

h) if the employees are appointed for the purpose of a scheme, they do not acquire vested right of continuance after the project is over.

३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ.(श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थान शासन सिव्हील अपिल क्र.७७४४/१९९७ याप्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशात देखील स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. सदर आदेशात आणखी स्पष्ट केले आहे की, तात्पुरत्या /अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

४. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील दोन्ही निर्णयातील केवळ ठळक बाबी वर नमूद केलेल्या आहेत. अधिक तपशिलाकरीता संबंधितांनी मा.न्यायालयाचा संपूर्ण निकालाचे अवलोकन करावे, असेही सूचित करण्यात येत आहे.

५. यास्तव प्राधिकरण व विभागीय मंडळांच्या सर्व विभाग प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहित मार्गाने/माध्यमांमार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात

आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच, अशा कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच, यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्याय निर्णयांचा संदर्भ देऊन युक्तीवाद करण्याच्या सूचना संबंधित सरकारी वकीलांना देण्यात याव्यात.

६. उपरोक्त विषयी वरीलप्रमाणे आवश्यक त्या सूचना शासनाकडून दिनांक २५/८/२००५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे करण्यात आलेल्या आहे. (प्रत संलग्न)

७. सदरहू परिपत्रक सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या अखत्यारीतील कार्यालयप्रमुखांच्या निर्दशनास आणावे.

**सोबत :** वरीलप्रमाणे.

(शिवाजी दिवेकर)
**सचिव/प्राधिकरण.**

**प्रति,**

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मुख्य अभियंता/प्रा. (१/२)
३. वित्त नियंत्रक/प्रा.
४. विधी सल्लागार/प्रा.
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
७. चौकशी अधिकारी/प्रा.
८. सक्षम प्राधिकारी (१) (२) /प्रा.
९. जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१०. मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./मुं.इ.दु.व पु.मं./मुं.झो.सु.मं. कोंकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती मंडळ
११. सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
१२. उपमुख्य अभियंता, [संगणक कक्ष ]/प्रा. /द.व गु.नि./प्रा./जेएनएनयुआरएम/प्रा./ नियोजन/ एस.आर.डी./स्थापत्य/मुं.मं./ परिमंडळ-१, २, ३, ४ /दु.व पु.मंडळ
१३. वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार /मुं.मं.
१४. कार्यकारी अभियंता, (विद्युत)/[ दुरुस्ती]/(वांद्रे)/[घाटकोपर ]/(एस.आर.डी.-१)/ (एस.आर.डी.-२)/ (एस.आर.डी.-३) /(प्रनिस)/मुं.मं.
१५. कार्यकारी अभियंता,१,२,३/प्रा. / विद्युत/प्रा.
१६. कार्यकारी अभियंता (पूर्व) (पश्चिम) (शहर) ग.व.सु.मंडळ
१७. संचालक पणन कक्ष/मुंबई मंडळ.
१८ मुख्य लेखाधिकारी/मुं.गृ.व क्षे.वि.मं./मुं.इ.दु.पु.मं./मुं.ग.व.सु.मं.
१९. उपनिबंधक सहकारी संस्था/मुं.मं.
२०. उपमुख्य अधिकारी [ मि.व्य. १/२]डब्ल्यू /मुं.मं./ पु.गा./सं.गा./सहकार कक्ष,दु.व पु.मं

२१. मिळकत व्यवस्थापक (१) (२) (३) (४) (५)/मुं.मं. (पु.गा.)/ (सं.शि.)दुवपुमं.
२२. लेखाधिकारी/प्रा. डब्ल्यु./मुं.मं.
२३. सहाय्यक लेखाधिकारी (उत्तर) (दक्षिण) (मध्य)/मुं.इ.दु.व पु.मंडळ
२४. मुख्य लेखा अधिकारी कोंकण/पुणे नाशिक औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
२५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी/प्रा.
२६. संचालक/पी.डी.सी. पुणे.
२७. कार्यकारी अभियंता / ए, बी, सी-१, सी-२, सी-३, डी-१, डी-२, ई-१, ई-२, फ/ग दक्षिण, फ (उत्तर), ग (उत्तर), मुं.इ.दु.व पु.मंडळ
२८. सह संचालक/शि.पु.प्र.लि.

**प्रत** प्रशासकीय अधिकारी/प्रा./मुं.मं./ दुवपुमं.

प्रत माहितीसाठी :-
मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

प्रत माहितीसाठी :-
मा.सभापती, मुंबई मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, मुंबई इ.दु. व पु. मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, मुंबई झो.सु. मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, पुणे मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, औरंगाबाद मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, नाशिक मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, नागपूर मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, अमरावती मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा.सभापती, कोंकण मंडळ यांचे स्वीय सहाय्यक

**प्रत**, अध्यक्ष ,महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
**प्रत**, प्रधान कार्यवाह ,मागासवर्गीय कर्मचारी संघटना
**प्रत**, अध्यक्ष,ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा,मुंबई.

**प्रत** :-श्रीमती पाटील, शाखा अभियंता (चौकशी कक्ष )/प्रा.
**प्रत** :-सर्वश्री.बावदाने, महाडीक, बैकर, केदारे, लाड आणि श्रीमती के.एन.पवार, श्रीमती कुष्टे, श्रीमती एस.एस.पाटील श्रीमती पाटील, सहाय्यक श्री.वैद्य, श्री.वाघमारे, श्री.गायकवाड, व.लि.

**प्रत** लेखापाल/प्रा.
श्रीमती लाडी, व.ले.प.
श्रीमती चौधरी, देयक लिपिक./प्रा.

**प्रत** निवडनस्ती (परिपत्रक)

**मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी**
**<u>नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :-२५ ऑगस्ट,२००५.**

## <u>परिपत्रक</u>

शासकीय, निमशासकीय, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था यामधील गट-अ ते ड मधील सरळसेवेच्या कोटयातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध विभागांनी नियुक्त केलेल्या निवडसमित्या यांच्यामार्फत स्पर्धा परीक्षाद्वारे निवड केलेल्या उमेदवारांमधून भरण्यात येतात. तथापि काही वेळा आयोग पुरस्कृत किंवा निवडसमित्यानी पुरस्कृत केलेले उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे किंवा निवडसूची संपुष्टात आल्यामुळे नियमितरित्या नामनिर्देशनाद्वारे पदे भरणे शक्य होत नाही. तेव्हा तातडीची गरज म्हणून लोकसेवा आयोगाच्या किंवा निवड समित्यांच्या शिफारशीशिवाय काही नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून तीन महिन्याच्या किंवा चार महिन्याच्या तत्वावर तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या केल्या जातात. तथापि अशा तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या विशिष्ट मुदतीनंतर संपुष्टात आणल्या जात नाहीत. त्या दीर्घ काळ चालू राहतात. त्यामुळे असे अस्थायी कर्मचारी सेवेत कायम करण्याची मागणी करतात. त्यांची सदर मागणी मान्य न केल्यास ते न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र संबंधित नियम, आदेश यांचा योग्य आधार घेऊन शासनाची बाजू योग्य रितीने न्यायालयात मांडली जात नाही. तसेच अशा प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश न्यायालयांच्या निदर्शनास आणले जात नाही. सबब अशा प्रकरणात निर्णय शासनाविरुध्द लागतात. परिणामी अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करावे लागते. अनेक प्रकरणात न्यायालयांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सेवा प्रवेश नियमातील अटी देखील शिथिल कराव्या लागतात.

२. अशाच एका प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार, को.ऑ.सोसायटीज, तामिळनाडू व इतर या सिव्हिल अपिल क्र.१४१३/२००३ आणि ३७७४-७६, ४४४६, ६४१५-१६, ७२८२, ९८५४, ९९३३, १०२४४-४५/२००३, ४४९५/२००४ आणि ४४७/२००४ या प्रकरणी दिनांक २८ जुलै,२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्याची सूचना केली होती. त्यास अनुसरुन सदर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयातील संक्षिप्त बाबी खालीलप्रमाणे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

a) Regularisation cannot be mode of recruitment by any State within the meaning of Article 12. It is a settled proposition that the appointment made in violation of the mandatory provision of the statute and in particular ignoring the minimum educational qualification and other qualifications would be wholly illegal and such <u>illegality cannot be cured by taking recourse of regularisation.</u>

b) Those who come by back door should go through that door.

c) Regularisation further cannot be given to the employees whose services are ad-hoc in nature.


D:\Desk 12\G.RG.R.25-8-20005(paripatrak)
रोटा/एच-1073(4,500-8-2005)-1

d) No regularisation is permissible in exercise of the Statutory power conferred under Article 12 of the Constitution of India when the appointments are in contravention of the statutory rules.

e) No regularisation is permissible in exercise of the statutory power conferred under Article 162 of the Constitution if the appointments have been made in contravention of the statutory rules.

f) It is trite that appointments cannot be made on political considerations and in violation of the Government directions for reduction of establishment expenditure or filling up of vacant posts or creating new posts including regularisation of daily wage employees.

g) There is no scope for regularisation unless the appointments were made on a regular basis.

h) If the employees are appointed for the purpose of a scheme, they do not acquire vested right of continuance after the project is over.

३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ.(श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थान शासन सिव्हिल अपिल क्र.७७४४/१९९७ याप्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशात देखील स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. सदर आदेशात आणखी स्पष्ट केले आहे की, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील दोन्ही निर्णयातील केवळ ठळक बाबी वर नमूद केलेल्या आहेत. अधिक तपशिलाकरीता संबंधितांनी मा.न्यायालयाचा संपूर्ण निकालांचे अवलोकन करावे, असेही सूचित करण्यात येत आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्याय निर्णयांचा संदर्भ देऊन युक्तीवाद करण्याच्या सुचना सरकारी वकीलांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

न. कुमार

(नवीन कुमार)

अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,

सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* सचिव,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

------